.. savAI ..

## ॥ सवाई ॥

गंगा देवेन्द्रे आणी । नाम तिचे इन्द्रायणी ॥
श्रीसिद्धेश्वर तये तिरी । घाटावरी भक्त पुंडलीक ॥ १॥
दृष्टान्ते आज्ञा झाली । विठ्ठलासि सिद्धोपंत विनवी ॥
रुक्मिणी घ्या पदरी । नीइयतीसी जगत् उद्धार ॥ २॥
सवचे आज्ञा पांडुरंगाची । मंगल वीवाह वीठ्ठल रुक्मिणी ॥
सप्तपदी चालुनीशी । सोहळा आनन्दाचा ॥ ३॥
जन्म ज्यांचा ' श्रीमुख' संवत्सरे ।
साक्षात श्रीशंकर सोमवारे ।
माघ वद्य प्रतिपदा असे । सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथ ॥ ४॥
पर्जन्य वृष्टी ' युवा' संवत्सरे । गोकुळ अष्टमीचा उत्सव होतसे ॥
मध्यरात्र उत्तम गुरुवारे । माउली श्रीज्ञानदेव ॥ ५॥
नाम संवत्सरे ' ईश्वर्' । त्रिपुरी पौर्णिमेचि रात्र प्रहर ॥
येळकोट मल्हारीचा । ब्रह्मदेव श्रीसोपान ॥ ६॥
घटस्थापना यथायोग्य । ' प्रमाथी' संवत्सरे आश्वीन ॥
प्रतीपदा शुक्रवार माध्यान । आदीमाता श्रीमुक्ताई ॥ ७॥
व्याघ्र घनघोर ब्रह्मगिरी । घालीतसे प्रदक्षीणा श्रीनिवृत्ती ॥
भवीष्यवाणी नीयतीची । शीष्यत्व प्राप्त गहिनीनाथांचे ॥ ८॥
तीर्थ क्षेत्र अलकापुरी । आजही आहे माय माउलि ॥
बन्धु सोपान गुरु निवृत्ती । मुक्ताई भगीनी शोभतसे ॥ ९॥
रेडे वदविला वेद । ज्ञाना म्हणणार्यासी भेद ॥
समस्त आपेगाव ग्रामस्थ । थोर आश्चर्य ॥ १०॥
दादा गेले स्नानासी । भाऊही गेला सरपणासी ॥
मुक्ताई माऊलीसी । करितसे गोष्टी भरणासी उदर ॥ ११॥
ज्ञानेश्वरी अमृतानुभव गाथादि । कल्पवृक्षा पीयुषी ॥
वर्षे साडेसातशे पूर्वी । प्रत्यय येतसे सदा ॥ १२॥
चौदाशे वर्षांचे तप । करी घेऊनी सर्प ॥
व्याघ्रावर होऊनी स्वार । आदीनाथ शीष्य श्रीचांगदेव ॥ १३॥
दर्शनासी बन्धु आणि भगीनी । भींत अपूर्व चालवीली ॥
माऊली वदती पासष्टी । तत् त्व मसीचा सोहळा ॥ १४॥
श्रीसद्गुरुंचा आशीर्वाद घेता । वद्य त्रयोदीशी कार्तीका ॥
श्रीकृष्णे पांडुरंग श्रीविठ्ठल । अलकापुरी समक्ष ॥ १५॥
मार्गशीर्ष वद्य त्रयोदीशी । येथेच सासवड ग्रामासी ॥



From http://sanskritdocuments.org

काकांनि घेतली समाधी ।सुगन्ध चन्दनाचा ॥१६॥
आद्य लिंग त्र्यम्बकेश्वरी ।ज्येष्ठ वद्य द्वादशीसी ॥
श्रीनिवृत्ती घेतली समाधी ।मुक्ताई एकलीच ॥१७॥
वैशाख वद्य द्वादशीसी ।विद्युलतेसरशी समाधी ॥
एदलाबाद मेहुणपुरी ।मुक्ताई आदीमाता ॥१८॥
ज्यांचे ऊदरी त्रिदेवादिमाता ।देही पावली मोक्षे मुक्ता ॥
धन्य धन्य माता पिता ।विठ्ठल रुक्मिणी ॥१९॥
साम्बसदाशिव श्रीहरि ब्रह्मा ।नाथ माऊली काका ॥
आदीमाता मुक्ताई अपर्णा ।विठ्ठल रुक्मिणी ॥२०॥
सन्त असती आह्मा अनेका ।पंचारती ओवाळीती सर्वा ॥
ग्रामस्थ जमले मन्दिरा ।मोरया निवासी चिंचवडाधीशा ॥२१॥
गीतेचे अध्याय अठरा ।ज्ञानेश्वरी श्लोक शे अठरा ॥
ही सवाई मात्र एकवीसा ।मनो भावे समर्पिली कुल्कर्ण्यासी ॥२२॥
तव पदी आपली क्षमा ।सन्त सज्जनहो तुम्ही मला ॥
उशीर होतसे घरा ।लक्ष पायी ठेविला ॥२३॥
म्हणावा जय जय सीताराम

Written by Jayant Madge Jayant.Madge at skf.com

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 31, 2005

sanskritdocuments.org



From http://sanskritdocuments.org